# ड्रॅगन फ्रूट

GVT कृषीकुल

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535

**क्षेत्रफळ:** 23 गुंठे
**प्रजाती:** जम्बो रेड, C, व्हिएतनाम यलो, व्हाईट
**लागवडीचे अंतर:** 8 x 7 फूट
**झाडांची संख्या:** 430
**लागवड पद्धत:** रुंद वरंबा (गादी वाफा)
**लागवड कालावधी:** 18 जून 2025

**हवामान आणि जमीन:** ड्रॅगन फ्रूट गरम व कोरड्या हवामानात चांगल्या प्रकारे वाढतो. तीव्र थंडी व गारठा सहन करत नाही. कमी पावसाच्या भागात लागवड केल्यास फायदा होतो. हलकी ते मध्यम, चांगला निचरा होणारी, वालवंट मिश्रित जमीन लागवडीसाठी योग्य असते. जमिनीचा pH 5.5 ते 7.0 दरम्यान असावा.

**लागवड पद्धत:** 20–25 सेमी लांब देठाचे कटिंग्ज किंवा निरोगी रोपे लागवडीसाठी निवडावीत. लागवडीसाठी 8 x 6 फूट किंवा 8 x 7 फूट अंतर ठेवावे. पाण्याची सुविधा असल्यास अत्यंत उष्ण महिन्यांव्यतिरिक्त कोणत्याही वेळी लागवड करता येते. लागवडीपूर्वी आधार संरचना (सिमेंट किंवा लाकडी खांब) उभारणे आवश्यक असते.

**खत व्यवस्थापन:** लागवडीपूर्वी शेणखत किंवा कंपोस्ट जमिनीत मिसळावे. लागवडीनंतर पिकाच्या टप्प्यानुसार रासायनिक व सेंद्रिय खतांचा नियमित वापर शिफारशीनुसार करावा.

**पाणी व्यवस्थापन:** या पिकाला पाण्याची गरज फार कमी असते. हिवाळा व उन्हाळ्यात नियमित पाणी देणे फायदेशीर असते. ठिबक सिंचनाचा वापर करावा. एकाच वेळी जास्त पाणी देऊ नये.

**फळधारणा:** लागवडीनंतर 18 ते 22 महिन्यांनी फळधारणा सुरू होते.

**उत्पादन:** व्यवस्थित नियोजन आणि व्यवस्थापन असलेल्या बागेमध्ये दुसऱ्या वर्षापासून फुलोरा आणि फळे दिसू लागतात. मात्र, आर्थिक उत्पादन तिसऱ्या वर्षापासून सुरू होते.

**तोडणी:** फळे पूर्ण पिकल्यावरच तोडणी करावी. फळांचा रंग गुलाबी किंवा पिवळा झाल्यावर ती काढणीसाठी तयार असतात.

**कीड व रोग:** ड्रॅगन फ्रूटच्या बागेला कीड व रोग यांचा फारसा प्रादुर्भाव होत नाही. मात्र, स्टेम कँकर, अँथ्रॅक्नोज, स्टेम रॉट आणि रूट रॉट यांसारखे बुरशीजन्य रोग दिसू शकतात. फळमाशी, मेलीबग व स्केल अशा कीटकांचा प्रादुर्भाव देखील आढळतो.